# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ सा.प्र./२२६ /2024-25 दि. ०२ /१२ /2024

**// परिपत्रक //**

**विषय :- विभागाकडील आवक पत्र व्यवहार बंद करणे बाबत.**

**संदर्भ :- माहिती व तंत्रज्ञान विभाग जा.क्र.मनपा/ माहिती व तंत्रज्ञान/२८७/ २०२३-२४ दि. १३/१०/२०२३ रोजीचे परिपत्रक.**

मिरा भाईंदर महानगरपालिका विभागांचे प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व पारदर्शक होण्याकरिता "ई-ऑफिस" प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. शासनाने विकासित केलेल्या ई-ऑफिस प्रणालीचे महानगरपालिकेचे वर्ग १, २ व ३ च्या अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. संदर्भिय परिपत्रकान्वये सर्व विभागांना दि. १६/१०/२०२३ पासून कार्यालयीन कामकाज ई-ऑफीस प्रणालीव्दारेच पाठविणेत यावे असे मा.आयुक्त महोदय यांनी निर्देश देण्यात आले आहे.

तरी सर्व विभागांना सुचित करण्यात येते की, आपल्या विभागासंबंधित नागरीकांकडून प्राप्त सर्व अपिल/ माहिती अधिकार/ तक्रार/ निवेदन/ विनंती अर्ज हे परस्पर विभागात आवक न घेता आवक-जावक कक्षामार्फतच ई-ऑफिस प्रणालीव्दारे उपलब्ध करूण घेण्यात यावेत.

**(कल्पिता पिंपळे)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
**सर्व खाते प्रमुख/ विभाग प्रमुख**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१

माहिती व तंत्रज्ञान विभाग

संकेतस्थळ - www.mbmc.gov.in ई-मेल - it@mbmc.gov.in संपर्क – २८१९२८२८- २५१


जा.क्र.मनपा/ माहिती व तंत्रज्ञान / २८१/२०२३-२४ दि. १३/१०/२०२३

## // परिपत्रक //

**विषय : ई-ऑफीस प्रणालीद्वारे प्रस्ताव, देयक, पत्रव्यवहार व कार्यालयीन कामकाज करणेबाबत.**

**संदर्भ : १) जा.क्र.मनपा/आयुक्त/५१/२०२३-२४ दि.३१/०८/२०२३ रोजीचे परिपत्रक**
**२) जा.क्र.मनपा/माहिती व तंत्रज्ञान/२४६/२०२३-२४ दि.१२/०९/२०२३ रोजीचे प्रशिक्षण पत्र**
**३) दि.१५/०९/२०२३ ते दि.१३/१०/२०२३ पर्यंत ई-ऑफीसचे विभाग निहाय ई-ऑफीस प्रशिक्षण**

मिरा भाईंदर महानगरपालिका विभागांचे प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व पारदर्शक होण्याकरिता "ई-ऑफीस" प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यासाठी स्वतंत्र "ई-ऑफीस" विभागाची वरील संदर्भिय प्रत्यायोजन आदेशान्वये स्थापना करण्यात आलेली आहे. शासनाने विकसित केलेल्या ई-ऑफीस प्रणालीचे महानगरपालिकेचे वर्ग १ व वर्ग २ अधिका-यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सर्व विभागांनी सोमवार दि.१६/१०/२०२३ पासून आपल्या विभागाचे प्रस्ताव, देयके, पत्रव्यवहार व कार्यालयीन कामकाज ई-ऑफीस प्रणाली द्वारेच पाठविणेत यावे.

**(संजय श्रीपतराव काटकर)** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति**

१) अतिरिक्त आयुक्त १
२) अतिरिक्त आयुक्त २
३) उपायुक्त (सर्व)
४) शहर अभियंता
५) मुख्यलेखाधिकारी
६) मुख्यलेखापरिक्षक
७) खाते प्रमुख/विभागप्रमुख (सर्व)